पुणे शहर पोलीस

# दर्पण

ऑगस्ट २०१९

# अभिप्राय...

## स्वारगेट पोलीस स्टेशन पुणे शहर

### दर्पण पुस्तीका अभिप्राय

१)पोलीस कर्मचारी यांचे संपुर्ण नाव : गणेश सुभाष खांडेकर

२)पदनाम : पोलीस शिपाई

३)बक्कल नंबर : 8814

४)नेमणुकीचे ठिकाण / पो स्टे : स्वारगेट पो.स्टे. पुणे

५)दर्पण पुस्तीकेबाबत आपला प्रतिक्रीयात्मक अभिप्राय/मत -

दर्पण या पुस्तकातील माहिती पोलिसांसाठी खूप छान लिहिलेली आहे, या पुस्तकात पोलीस खात्याबद्दलची माहिती वाचायला मिळते तसेच पोलिसांनी केलेली काम याची माहिती दर्पण या पुस्तकातून अतिशय समर्पक रित्या सांगितलेली आहे।

तसेच या पुस्तकातील माहिती ही आमच्यासाठी तसेच आमच्या कामात तिचा चांगला उपयोग होत असून ती अतिशय महत्त्वाची आहे.

दिनांक: 24/08/2019

स्वाक्षरी PC 8814

---

प्रति,
मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो,
विश्रांतवाडी पो.स्टे. पुणे शहर

प्रतिवेदक :- एम.डी. [illegible] म.पो.उप.निरीक्षक.
विश्रांतवाडी पो.स्टे. पुणे शहर.

विषय :- दर्पण पुस्तकाचे अभिप्राय बाबत.

महोदय,
उपरोक्त विषयाचे अनुषंगाने सादर करते की मा. पोलीस आयुक्त पुणे शहर यांनी त्यांचे संकल्पनेतून तयार करण्यात आलेली 'दर्पण' पुस्तिकेचे आम्ही प्रत्येकांनी वाचन केले आहोत. त्यामुळे आम्हाला पोलीसांकडे केलेल्या चांगल्या कामाविषयी बाबत माहिती मिळून त्याप्रमाणे कार्य करण्यास आम्हाला प्रोत्साहन मिळत आहे.

आम्ही [illegible] स्टेशन डायरी येथे पोलीस ठाण्याकडील 'दर्पण' पुस्तिका ही ठेवून आल्याने पो.स्टे येथे येणाऱ्या अर्जदार व नागरिकांनी वाचण्यास देऊन सदर पुस्तिकेमुळे नागरिकांच्या मनात पोलीसांबाबत चांगली प्रतिमा निर्माण होण्यास मदत होत आहे.

मा. सादर व्हावे

म. पोलीस उप-निरीक्षक
वि.वाडी पो.स्टे पुणे.

# समुपदेशन व
# सामाजिक बांधिलकी

समुपदेशन व
सा. बांधिलकी

# भरपावसात बालकाला मंदिरात सोडून पित्याचा पळ

## कर्वेनगरातील घटना : आईवडिलांच्या भांडणात फरपट; वारजे पोलिसांनी आईचा शोध घेऊन मुलाला केले स्वाधीन

**पुणे / वारजे : वार्ताहर**

आईवडिलांच्या भांडणात दोन वर्षांच्या चिमुकल्याची चांगलीच फरपट झाली असून, चक्क वडिलांनीच त्याला भर पावसात अंधाऱ्या रात्री एका मंदिरात सोडून पळ काढल्याची हृदयद्रावक घटना समोर आली.

एका तरुणाने पहाटेच्या वेळी मुलाला रडताना पाहिल्यावर हा प्रकार समोर आला. त्यानंतर वारजे माळवाडी पोलिसांनी त्याच्या आईचा शोध घेत त्याला सुखरूप त्यांच्या स्वाधीन केले. ही घटना मंगळवारी घडली.

चंद्रशेखर सुधाराम पुष्टी (वय दोन वर्षे, रा. रहाटणी) असे या चिमुकल्याचे नाव आहे. तर, प्रणीत सूर्यवंशी (वय २४, रा. कर्वेनगर) या तरुणामुळे हा सर्व प्रकार समोर आला. प्रणीत मध्यरात्रीनंतर दोन वाजण्याच्या सुमारास कर्वेनगर येथील महालक्ष्मी मंदिराजवळ आल्यानंतर त्याला जिवाच्या आकांताने रडणाऱ्या एका चिमुकल्याचा आवाज आला. पहाटेचे दोन वाजलेले.. त्यात कोसळणारा मुसळधार पाऊस.. यामुळे प्रणीतने दुचाकी थांबवली. या वेळी मंदिराच्या पायऱ्यावर एक चिमुकला जीव मुठीत धरून रडत असल्याचे त्याला दिसले. त्याने तत्काळ या मुलाला उचलून घेतले. चिमुकला थंडीने अन् पावसामुळे कुडकुडत होता. थेट कर्वेनगर पोलिस चौकीत त्याने धाव घेतली. तशी सर्व माहिती प्रणीतने पोलिसांना दिली. वरिष्ठ निरीक्षक प्रकाश खांडेकर यांनी बिट मार्शलवरील कर्मचारी अमोल पायगुडे, बाबासाहेब नरळे, भास्कर खोत यांना सूचना देऊन माहिती घेण्यास सांगितले. कर्मचारी परत या मुलाला घेऊन घटनास्थळी गेले.

स्थानिक नागरिक बिभीषण मुंडे यांच्या मदतीने नागरिकांना उठवून मुलाबाबत चौकशी केली; पुण्यातूनही मुलगा बेपत्ता झाला याची माहिती मिळाली नाही. यानंतर पिंपरी चिंचवड पोलिस आयुक्तालयाशी संपर्क साधण्यात आला. या वेळी रहाटणी परिसरात दोन वर्षांचा मुलगा हरविल्याची तक्रार महिलेने दिल्याचे समोर आले. यानंतर वाकड पोलिसांशी संपर्क साधला तसेच त्यांना या चिमुकल्याचे फोटो पाठविले. या वेळी तोच मुलगा असल्याचे समोर आले.



चिमुकलीला पाहताच आईच्या चेहऱ्यावर हास्य परतले.

### प्रणीत देवदूत ठरला!

वाकड पोलिस पहाटेच्या वेळी मुलाला घेऊन गेले. तसेच, आईला पोलिस ठाण्यात बोलवून घेतले. या वेळी आईला पाहताच चिमुकल्याने जोरात झेप घेतली. हे दृश्य पाहून पोलिसांचे डोळेही पाणावले होते. तसेच, मंदिराजवळून ज्या वेळी प्रणीत जात होता, त्या वेळी परिसरात गडद अंधार होता आणि मोठा पाऊस सुरू होता. अशा स्थितीतही प्रणीतने थांबून मंदिरात जाऊन पाहिले. त्यामुळे या मुलाचा शोध लागला आणि तो आपल्या आईच्या कुशीत सुखरूप विसावला. प्रणीत या मुलासाठी देवदूत ठरला! प्रणीतच्या या कार्यामुळे वरिष्ठ निरीक्षक प्रकाश खांडेकर यांनी त्याचे कौतुक करत आभार मानले.

**पुढारी** – दि. ३० ऑगस्ट, २०१९

संक्षिप्त



३७ वी पुणे व पिंपरी चिंचवड परिक्षेत्रीय क्रीडास्पर्धेचे उदघाटन शिवाजीनगर मुख्यालयात करण्यात आले.

## पोलिस क्रीडा स्पर्धेचे उदघाटन

**पुणे :** शिवाजीनगर पोलीस मुख्यालय येथे शुक्रवारी ३७ वी पुणे व पिंपरी चिंचवड परिक्षेत्रीय क्रीडा स्पर्धेचे उदघाटन करण्यात आले. यामध्ये सांघिक व वैयक्तिक क्रीडा प्रकारच्या स्पर्धा होणार असून स्पर्धेत पुणे व पिंपरी चिंचवड आयुक्तालयातील २५५ पोलीस खेळाडूंनी सहभाग घेतला. मुख्यालयाचे पोलिस उपायुक्त विरेंद्र मिश्र यांनी दीपप्रज्वलन करून स्पर्धेचे उद्घाटन केले. खेळातील नैपुण्य दाखवून, उत्कृष्ट खेळ करून जास्तीत जास्त पारितोषिके मिळविण्यासाठी प्रयत्न करावेत असे त्यांनी मार्गदर्शन केले.

## सफाई कर्मचारी महिलेचा प्रामाणिकपणा

**बिबवेवाडी :** रस्ता सफाई करत असताना सापडलेले दीड किलो चांदीचे दागिने महिला सफाई कर्मचाऱ्याने बिबवेवाडी पोलिसांच्या हवाली केले. कस्तुराबाई गोरख हनवते (५०, रा. पर्वती दर्शन) असे या महिलेचे नाव आहे. महिलेच्या प्रामाणिकपणाबद्दल त्यांचे पोलिस निरीक्षक मुरलीधर करपे व नगरसेविका मानसी देशपांडे यांनी अभिनंदन केले. हनवते या सकाळी नेहमीप्रमाणे कोठारी ब्लॉक बिबवेवाडी येथील रोडवर साफसफाई करत होत्या. त्यांनी रस्त्यावरील एक पिशवी मिळाली कचऱ्याची समजून प्लास्टिकच्या बकेटमध्ये टाकली असता भांडी वाजल्यासारखा आवाज आला. त्यांनी पिशवी उघडून पाहिली तेव्हा त्यामध्ये दीड किलो वजनाचे चांदीचे दागिने मिळून आले.



महिलेचा सत्कार करताना पोलिस अधिकारी व नगरसेविका.

**पुण्यनगरी** – दि. १८ ऑगस्ट, २०१९

# पोलीस बांधवांप्रति आदराची भावना बाळगा : अमृत पठारे



**पुणे :** पोलीस आणि सैनिक चोवीस तास कार्यरत आहेत. त्यांना कुटुंबासमवेत सण-उत्सव साजरा करणे दुर्मीळच असते. त्यांच्याप्रती आदर आणि आपुलकीची भावना प्रत्येकाने जपली पाहिजे, असे मत अमृत बहुद्देशीय संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा अमृत पठारे यांनी व्यक्त केले. अमृत बहुद्देशीय संस्थेच्या अध्यक्षा अमृत पठारे यांनी चंदननगर पोलीस चौकीमधील रक्षाबंधनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या वेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक कृष्णा इंदलकर, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सत्यवान पाटील, बाप्पू भुजबळ, अनिरुद्ध जायभाये, किरण पलांडे, राहुल इंगळे, कृष्णा बुद्धवंत यांच्यासह पोलीस अधिकारी- कर्मचाऱ्यांना राखी बांधून बहीण-भावाचे अतूट नाते विश्वासाचे घट्ट करत राखी बांधून पुन्हा एकदा दृढ केले. याप्रसंगी अंबिका ताटीकोंडा, मोनिका गलांडे, पूजा धुमाळ, प्रियांका काकडे, श्वेता घाडगे, सारिका शिंदे, ज्योती बेल्हेकर, अंजू शहा आदी संघटनेच्या महिला उपस्थित होत्या. दरम्यान, आमदार जगदीश मुळीक यांच्या जनसंपर्क कार्यालयात जाऊन राखी बांधून बहीण-भावाचे नाते दृढ केले.

**पुढारी** – दि. २० ऑगस्ट, २०१९

# चुकलेल्या आजींचा पोलिसांनी घेतला शोध

पुणे : प्रतिनिधी

पुण्यातील दगडूशेठ गणपतीचे दर्शन घेण्यासाठी आलेल्या एक आजी मनपा परिसरातून चुकल्या. पोलिसांनी व्हॉट्सॲपच्या मदतीने त्यांचा शोध घेऊन त्यांना कुटुंबीयांकडे सुखरूप सुपूर्द केले.

चंदा ज्ञानेश्वर माने (६०, रा. रोहना, ता. आर्वी, जि. वर्धा) असे या आजींचे नाव आहे. माने या त्यांच्या काही नातेवाइक तसेच गावातील नागरिकांसोबत रविवारी दुपारी आळंदी येथे दर्शनासाठी आल्या होत्या. आळंदीवरून ते सर्व जण दुपारी चार वाजेच्या सुमारास दगडूशेठ गणपतीचे दर्शन घेण्यासाठी बसने मनपा बसस्थानकाजवळ उतरले. येथून पायी चालत जात होते, परंतु काही अंतरावर गेल्यानंतर माने यांचा भाचा सुनील यांना आजी नसल्याचे लक्षात आले. त्यांनी तत्काळ शिवाजीनगर पोलिस चौकीत धाव घेऊन माहिती दिली. या वेळी बीट मार्शल कर्मचारी कदम, भेगडे तसेच कर्मचारी राऊत वागवले यांनी शोध घेण्यास सुरुवात केली. तसेच, या भागातील पोलिस मित्रांच्या व्हॉट्सॲप ग्रुपवर आजींचा फोटो पाठविला. कर्मचारी शिवाजीनगर गावठाण परिसरात शोध घेत असताना रात्री ७ वाजेच्या सुमारास कर्मचारी जगताप व शिरकांडे यांना आजी येथील नाना-नानी पार्क येथे मिळाल्या. भाचा सुनील याला चौकीत बोलावून त्याच्याकडे आजींना सुखरूप स्वाधीन केले.

**पुण्यनगरी** – दि. २३ ऑगस्ट, २०१९

# पोलिसांना मदत करणाऱ्या संस्थांचा सन्मान



**पुणे :** मागीलवर्षी गणेश विसर्जन काळात वाहतूक सुरळीत करणे, तसेच शांतता प्रस्थापित करणे, यासाठी अनेक सामाजिक संस्थांनी पोलिसांना सहकार्य केले. त्यामध्ये कुस्ती संकुल, एकता योग केंद्र, अभिनव शिक्षण संस्था आणि सिद्धीविनायक ग्रुप यांचा सहभाग होता. या संस्थांचा सत्कार सहायक पोलिस आयुक्त मालोजी राव पाटील, पोलीस निरीक्षक विष्णू ताम्हाणे यांच्याहस्ते करण्यात आला. या वेळी कात्रज परिसरातील विविध मंडळांचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी स.पो.आयुक्त मोलोजीराव पाटील यांनी मार्गदर्शन केले. तर, ॲड. दिलीप जगताप यांनी सूत्रसंचालन केले.

# पुणे व्यसनमुक्त बनविण्यासाठी प्रयत्न

## डॉ. के. वेंकटेशम यांचे प्रतिपादन; ग्रामदेवता पुरस्कारांचे वितरण

**पुणे, ता. १२ :** "समाजातील मोजकेच लोक इतरांच्या सेवेसाठी स्वतःला वाहून घेतात. त्यांच्याकडून आपल्याला प्रेरणा मिळते. त्यातूनच आम्ही पुणे शहराला व्यसनमुक्त बनविण्यासाठी प्रयत्न करीत आहोत. गणेशोत्सव मंडळांनीही सामाजिक कार्यात सहभाग वाढवावा," असे प्रतिपादन पोलिस आयुक्त डॉ. के. वेंकटेशम यांनी केले.

ग्रामदेवता श्री तांबडी जोगेश्वरी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ ट्रस्टतर्फे दिल्या जाणाऱ्या 'ग्रामदेवता' पुरस्कारांच्या वितरण प्रसंगी ते बोलत होते. आमदार माधुरी मिसाळ अध्यक्षस्थानी होत्या.

मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्राचे प्रमुख डॉ. अनिल अवचट, मेक माय ड्रीम फाउंडेशनच्या संस्थापिका मेधा कुलकर्णी आणि परभणीतील सोशिओ इकॉनॉमिक डेव्हलपमेंट ट्रस्टचे संस्थापक सूर्यकांत कुलकर्णी यांना 'ग्रामदेवता' पुरस्कार प्रदान करण्यात आला.

घोले रस्त्यावरील नेहरू सांस्कृतिक भवनात हा कार्यक्रम झाला. नगरसेवक हेमंत रासने, राजेश येनपुरे, योगेश समेळ, कसबा गणपती मंडळाचे अध्यक्ष श्रीकांत शेटे, तांबडी जोगेश्वरी मंडळाचे अध्यक्ष राजाभाऊ टिकार, उपाध्यक्ष प्रसाद कुलकर्णी आदी उपस्थित होते.




घोले रस्ता, नेहरू सांस्कृतिक भवन : ग्रामदेवता श्री तांबडी जोगेश्वरी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ ट्रस्टतर्फे दिल्या जाणाऱ्या ग्रामदेवता पुरस्कारांचे वितरण डॉ. के. वेंकटेशम यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी (डावीकडून) मेधा कुलकर्णी, माणिक कुलकर्णी, डॉ. अनिल अवचट, माधुरी मिसाळ, सूर्यकांत कुलकर्णी, डॉ. के. वेंकटेशम, राजाभाऊ टिकार आणि हेमंत रासने.

**पुण्यनगरी** – दि. २३ ऑगस्ट, २०१९

# हडपसर पोलीस स्टेशनमध्ये रक्षाबंधन



**पुणे :** भेकराईनगरमधील व्ही. क्लब उमंगच्या प्रेसिडेंट बसंती श्रीवास्तव आणि ग्रुप मेंबर नीता शेंडकर, मीना पिसाळ, नंदा मिरेकर आणि व्ही. क्लब मिरॅकल इमेजेसच्या प्रेसिडेंट किरण भुतडा, फाउंडर मेंबर अलका गंगवाल, सेक्रेटरी लक्ष्मी श्रीधर, ट्रीझर सौजन्या मजेठी यांनी हडपसर पोलीस स्टेशनमधील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना राखी बांधून बहीण-भावाचे नाते घट्ट केले.

**सामना** – दि. ०७ ऑगस्ट, २०१९

# चिमुरडीसह आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या गर्भवतीला पोलिसांनी वाचविले

पुणे, दि. ७ (प्रतिनिधी) – घरगुती कारणामुळे व पतीच्या मारहाणीला कंटाळून अडीच वर्षांच्या चिमुरडीसह कॅनॉलमध्ये उडी मारून आत्महत्या करण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका गर्भवतीला दामिनी मार्शल आणि स्वारगेट पोलिसांनी वाचविले आहे.



आशा संदीप गायकवाड (वय ३१, रा. काशेवाडी) आणि सायली संदीप गायकवाड (वय अडीच वर्षे) अशी वाचविलेल्यांची नावे आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, स्वारगेट वाहतूक विभागालगत असलेल्या कॅनॉलमध्ये चिमुरडीसह एक महिला आत्महत्येचा प्रयत्न करीत असल्याची माहिती दामिनी मार्शलसह कर्मचाऱ्यांना मिळाली.त्यानुसार दामिनी मार्शल जे. बी. भालेराव, रणसिंग, फुंदे, पाटील, मुल्ला हे कर्मचारी घटनास्थळी पोहोचले. त्यावेळी आशा तिच्या अडीच वर्षांच्या मुलीसह कॅनॉलमध्ये उडी मारण्याच्या तयारीत होती. त्यावेळी पोलिसांनी तिला आत्महत्येपासून परावृत्त करून धीर दिला. आशा गर्भवती असून, संदीपच्या मारहाणीमुळे आत्महत्या करणार असल्याचे तिने पोलिसांना सांगितले. त्यानुसार पोलिसांनी संदीपला स्वारगेट पोलीस ठाण्यात बोलावून समजावून सांगत दोघांतील वाद मिटविला.

पुण्यनगरी – दि. २० ऑगस्ट, २०१९

# गुन्हेगारी रोखण्यासाठी नागरिकांचा सहभाग आवश्यक

## पोलीस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम : फिक्की फ्लो संस्थेच्या चर्चासत्रात मार्गदर्शन

**पुणे : प्रतिनिधी**

समाजात कायदा व सुव्यवस्था राहावी, यासाठी पोलीस प्रशासनाकडून विविध योजना राबविण्यात येतात. ज्येष्ठांसाठी, महिलांसाठी, लहान मुलांसाठी असे वेगवेगळे सेल सुरू करून त्यामार्फत अधिकाधिक चांगली सेवा देण्याचा आणि शहराला सुरक्षित बनवण्याचा प्रयत्न पोलीस करीत आहेत. मात्र, समाजातील गुन्हेगारीचे प्रमाण कमी करण्यासाठी नागरिकांचा सहभाग महत्त्वाचा आहे, असे मत पोलीस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम यांनी व्यक्त केले.



फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजच्या लेडीज ऑर्गनायझेशन अर्थात फिक्की फ्लो संस्थेच्या वतीने आयोजित मार्गदर्शन सत्रात डॉ. व्यंकटेशम बोलत होते. याप्रसंगी फिक्की फ्लो पुण्याच्या चेअरपर्सन रितू छाब्रिया, सदस्य अनिता सणस यांच्यासह इतर पदाधिकारी व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

डॉ. व्यंकटेशम म्हणाले, महिला सुरक्षा, गुन्हेगारीला आळा, वाहतूक कोंडी, सायबर गुन्हेगारी आदी गोष्टींवर पुणे पोलीस चोवीस तास काम करीत आहेत. नागरिकांना चांगले आणि सुरक्षित आयुष्य कसे जगता येईल, यासाठी सतत नाविन्यपूर्ण योजना राबविल्या जात आहेत. त्यासाठी पोलीस काका, दामिनी पथक यासारखे विशेष विभाग कार्यरत आहेत. या सगळ्या उपक्रमांना नागरिकांची साथ मिळाली. तर, शहर गुन्हेगारी मुक्त व्हायला वेळ लागणार नाही.

# अभिप्राय...

मा. वरिष्ठ पो. निरीक्षक सो.
कोंढवा पोलीस स्टेशन, पुणे.
यांना सविनय सादर

रिपोर्ट - श्री. एम. पाडवी पोलीस उपनिरीक्षक, कोंढवा पोस्टे
यांजकडून.

विषय - दर्पण पुस्तकाबाबत.

दर्पण हा उपक्रम सुरु झाल्यापासून पोलीसांनी केलेल्या चांगल्या कामगिरीबद्दल लोकांना माहिती मिळते. या उपक्रमामुळे पोलीस व जनता यांच्यातील संबंध अधिक सुसंवादाय मदत होत आहे जनतेचा व सामान्य लोकांचा पोलीसांवरचा विश्वास अधिक बळकट होत आहे. मा. पोलीस आयुक्त सो. पुणे शहर यांनी सुरु केलेला दर्पण हा उपक्रम प्रशंसनीय असून तो पोलीसांसाठी व जनतेसाठी उपयुक्त असून मोलाचे मार्गदर्शक असा ठरला आहे.

मा. सादर सो.
दि. 18/05/19.
(स्वाक्षरी)
पोलीस उपनिरीक्षक
कोंढवा पो.स्टे. पुणे शहर

---

**सहकारनगर पोलीस ठाणे**

**दर्पण पुस्तिका अभिप्राय**

१) पोलीस कर्मचारी याचे पुर्ण नाव :- मिनाक्षी जितेंद्र महाडिक

२) पदनाम :- महिला पोलीस नाईक

३) बक्कल नंबर :- ५९९१

४) नेमणुकीचे ठिकाण :- सहकारनगर पोलीस स्टेशन, पुणे शहर

५) दर्पण पुस्तिकेबाबत आपला प्रतिक्रियात्मक अभिप्राय / मत :-

माननिय महोदय,
दर्पण पुस्तिकेचे वाचन केले. मा. पोलीस आयुक्त, पुणे शहर यांची कल्पना पोलीस दलातील अधिकारी / कर्मचारी, नागरिक यांना उत्कृष्ठ कामगिरी करण्यास प्रोत्साहन देणारी आहे. पोलीस आयुक्तालयातंर्गत येणाऱ्या पो. स्टेश दाखल गुन्हे, त्यांची थोडक्यात माहिती, तपासाबाबतची माहिती, पोलीसांकडून करण्यात येणाऱ्या चांगल्या कामगिरी दर्पण या पुस्तिके मार्फत वाचण्यास मिळाली. दर्पण पुस्तिके मार्फत संबंधित माहिती पुढे येणाऱ्या पोलीस बांधवाना प्रेरणा देणारी असेल. या पुस्तिकेचा संग्रह होणे आवश्यक आहे असे आवर्जून वाटत आहे. तसेच मा. पोलीस आयुक्त सरांची सदरची संकल्पना दैनंदिन कामकाजाकरीताही उपयोगी ठरेल. धन्यवाद सर.

दिनांक :- २९.०५.२०१९

Mahadik LPN 5991.
स्वाक्षरी



Man arrested for estranged girlfriend's murder attempt

Will act against illegal private security firms, warns police chief

बिबवेवाडीमध्ये सीसीटीव्हीचे लोकार्पण

बिबवेवाडी पोलिसांनी पाठलाग करून जप्त केली ३५० लिटर दारु

चालक व मालकांवर कारवाई करणार

अश्लील चाळे करणाऱ्या महिलांवर कारवाई

पाच जणांच्या टोळीला अटक

पेट्रोल पंपावर दरोडा टाकण्याच्या होते तयारीत

शाखेकडून गुंडांची झाडाझडती

वाहनांची तोडफोड करणारे गजाआड, पाच तासांत अटक

मसाज सेंटरच्या नावाखाली वेश्याव्यवसाय

धक्का लागला म्हणून कोयत्याने वार; तिघे जेरबंद

कर्ज फेडण्यासाठी झाला 'तो' साखळीचोर

चार किलो गांजासह आरोपीला अटक

पुरुषांपेक्षा पोलिसांवर महिलांचा विश्वास

महिला सुरक्षेसाठी 'दामिनी टू' पथक

पोलिसांना मदत करणाऱ्या संस्थांचा सन्मान

कमी किमतीत बुलेट देण्याचे आमिष

गावठी पिस्तूल बाळगणाऱ्या तिघांना अटक

पोलीस बांधवांप्रति आदराची भावना

बाळगा : अमृत पठारे

नात्यांमध्ये सुसंवाद ठेवणे आव्हानात्मक

चोरीला गेलेला मुद्देमाल पुन्हा मिळताच चेहऱ्यावर फुलले हसू

पोलिस ठाण्यांत आता 'सीपीओ'

Cops bust gang for duping finance cos of ₹4.5 crore

सुखकर्ता पुरस्काराचे वितरण उत्साहात

उत्सवात बेशिस्तीचे 'थर' नकोच

एका ढोल ताशा पथकाला एकाच मंडळात सहभागी होता येणार

Gang duping people with promise of real American dollars nabbed

हरविलेली बालके अखेर विसावली आईच्या कुशीत

नागरिकांच्या वॉर्डस्तरीय निधीतून संपूर्ण शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविणार

अशिक्षितांचा पोलिसांवर विश्वास

सोशल मीडियामुळे सापडला हरवलेला

दामिनींनी केले पाकीट परत

एका ढोल ताशा पथकाला मंडळात सहभागी होता येणार

पोलीस सहआयुक्त डॉ. रवींद्र शिसवे : विसर्जन

सराईत चोरट्याकडून २४ मोबाइल हस्तगत

गुन्हेगारी रोखण्यासाठी नागरिकांचा सहभाग आवश्यक

भरपावसात बालकाला मंदिरात सोडून पित्याचा पळ

विद्यार्थ्यांनी वाहतुकीच्या नियमांची जागृती करावी

राजेश पुराणिक : रामचंद्र महाविद्यालयामध्ये रस्ता सुरक्षा सप्ताह कार्यक्रम

हडपसर पोलीस स्टेशनमध्ये रक्षाबंधन

हेल्मेटमुळे वाचले वाहतूक पोलिसांचे

आईनेच केला चिमुकल्याच्या अपहरणाचा बनाव

गरिबीमुळे सांभाळ अशक्य, म्हणून दिले होते ओळखीच्या दाम्पत्याकडे

इंजिनिअर 'लखोबा लोखंडे' अखेर जेरबंद